घरचा शिंपी.

(A TAILOR'S HAND-BOOK.)

हें पुस्तक

रामकृष्ण नारायण पराडकर

ह्यांनीं केलें

तें

दत्तात्रय गणेश खांडेकर

ह्यांनीं आपल्या

लॉ प्रिंटिंग प्रेस मध्यें छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ति पाहिली.

सन १९०७.

किंमत ०२ आणे.

प्रस्तावना.

अलीकडे बहुतेक मंडळीस अमक्याच्या अंगच्या अमुक कपड्यास अमुक वार कापड लागतें असें माहीत नसतें व त्यास दर वेळेस शिंप्यास किती वार कापड लागेल ह्मणून विचारावें लागतें, व ते जितकें सांगतील तितकें कापड द्यावें लागतें. यामुळें त्यास फारच त्रास सोसावा लागतो; ही अडचण दूर व्हावी म्हणून आह्मीं मोट्या परिश्रमानें ह्या छोट्या पुस्तकांत मापें कशीं घ्यावींत यांची माहिती देऊन तसेंच अमुक मापाच्या कपड्यास अमुकच कापड पुरतें असें दाखविणारीं उदाहरणादाखल कोष्टकें दिलीं आहेत. सदरहू माहितीनें ज्यांस दुकानांत येऊन मापें देतां येत नाहींत, अशा लोकांस, मुख्यतः स्त्रियांस, वरीं मापें घेऊन शिंप्याकडे देतां येतील व कापड किती लागेल हेंही तावडतोब कळेल. तसेंच खेड्यापाड्यांतील व खेडवळ शहरांतील अंमलदारांस मोठे शहरांतून कपडे शिवून मागविण्याची सोय होईल. आमच्या गिऱ्हाइकांपैकीं पुष्कळांस सदरहू पुस्तकांत दिलेली माहिती नसल्यामुळें मोठाच त्रास पडूं लागला. यास्तव हें पुस्तक लिहून नेहमींची उणींव दूर करण्याचा प्रयत्न करावा लागला. तरी मंडळींनीं या पुस्तकांत सांगितलेल्या पद्धतीनें मापें घेऊन त्यांचें टिपण करून आमचेकडे पाठवून कपडे मागविल्यास अगर कांहीं पॅटर्न्स पाठविले असतां त्याप्रमाणें कपडे तयार करून पाठवूं. मापें बरोबर दिलीं ह्मणजे कपडा बेतशीर न होण्याची भीतीच नाहीं.

या पुस्तकावरून वरील माहिती होईल व याशिवाय जास्त माहिती करून घ्यावयाची असल्यास आमचें मोठें पुस्तक पहावें.

पुस्तककर्ता.

Tailor's Hand-Book.

घरचा शिंपी.

मापें कशीं घ्यावीं ?

ज्या ठिकाणचें माप घेणें असेल त्या ठिकाणच्या मध्यावर नाडीचें एक टोंक धरून त्या भागासभोंवार नाडी फिरवून धरलेल्या नाडीचे टोकापर्यंत आणावी ह्मणजे येणारे इंच त्या ठिकाणचें माप समजावें. चित्रांमध्यें अक्षरें व आंकडे घातले आहेत. कांहीं मापें पुढील बाजूनें व कांहीं पाठीमागील बाजूनें घेण्याचीं आहेत. एकेकदां सर्व मापें घेण्याची रीत दिली आहे. चित्रांत अर्धी बाजू दिसते परंतु माप घेतेंवेळीं सबंध घेराचें माप घ्यावें. प्रत्येक कपड्यास किती मापें घ्यावींत हें सांगितलें आहे; परंतु एकदां माप घेण्याची रीत सांगितल्यावर पुनः दुसऱ्या कपड्याच्या वेळीं ती सांगितली नाहीं. खालील अनुक्रमणिका थोरल्या पुस्तकाप्रमाणें आहे व समजुतीकरितां त्यांतलींच मुख्य प्रमाणमापें दिलीं आहेत.

देशी त० क० बेतण्याच्या पद्धति.

बाराबंदी:—कोठा—चित्र २. नाडीचें एक टोक छातीचे मध्यावर धरून दोन्ही कांखांतून व पाठीच्या खुब्यांवरून शरीराभोंवतालीं खुणा कग (३६ इंच). उंची चित्र १—गळा व मान यांचे मध्यापासून वापरणाराचे मर्जीप्रमाणें. साधारण मान ढुंगणाचे उचलते भागापर्यंत खुणा १-२ (२५ इंच). **बाही लांबी**—गळ्यापासून खांद्यावरून मनगटाजवळील हाड झांकून जाईपर्यंत खुणा १-५-६ (२९ इंच.)

दुहेरी गुंड्यांची बंडी:—सर्व मापें बाराबंदीप्रमाणें. कोणी बाहीचें माप कोपरापर्यंतच ठेवितात. कोटफॅशन बाही असल्यास चित्र ३. हात गुण्याचे आकृतींत धरून पाठीचे मध्यापासून बाही लागते येथपर्यंत. पुढें कोंपरापर्यंत, त्यापुढें मनगटापर्यंत. खुणा १-२-३-४. (७॥, १९॥, ३०॥ इंच). **गळा**—चित्र २ गळ्यासभोंवतालचा घेर. खुणा चट (१५ इंच).

कबजाः—कोठा. कमरेचा बारीक भागाचा घेर-चित्र २ खुणा पप (२९ इंच) उंची चित्र २. मानेजवळील ३ हाडांपैकीं मधले मोठ्या हाडापासून खालीं कमरेपर्यंत. त्यापुढें ढुंगणाचे उचलते भागापर्यंत खुणा टमड. (२२ इंच).

बंदाची पेटीः—कोठा—उंची कबजाप्रमाणें. गळा.

विजारः—चित्र २. ढुंगणाचे उचलते भागाचा घेर, खुणा जख. कमरेच्या बारीक भागाचा घेर खुणा मप. उंची कमरेच्या वर २ इंचांपासून खालीं गुडघ्यापर्यंत व त्यापुढें टांचेपर्यंत. खुणा १, २, ३. आंतील उंची दोन्ही मांड्यांचे मधील जांघेपासून गुडघ्यापर्यंत व त्या खालीं टांचेपर्यंत. खुणा ४, २, ३ मोहोळ-टांचे सभोंवतालचा घेर ५, ६.

चड्डी—ढुंगण. मांडीचे मोठ्या भागाचा घेर. उंची-कमरेपासून खालीं ढुंगण झाकेपर्यंत खुणा मघ.

बनातीची टोपी—कोठा--हातासकट आंगासभोंवारचा घेर. उंची--पागोट्याचे कोकीपासून गुडघ्यापर्यंत.

आंगरखा—कोठा. उंची मानेपासून खालीं गुडघ्यापर्यंत. किंवा वापरणाराच्या मर्जीप्रमाणें. चित्र १. खुणा १ पासून ४ पर्यंत. साधी बाही बाराबंदीप्रमाणें. कोटफॅशन बाही--दु० गुं० बंडीप्रमाणें. गळा.

सद्रा—कोठा. उंची--मानेपासून खालीं अदमासें ढुंगण झाकेपर्यंत. चित्र १ खुणा १--३ बाही गळा.

इंग्रजी त० क० बेतण्याच्या पद्धति.

शर्ट—मापें सदऱ्याप्रमाणें. फक्त उंची जरा जास्त ठेवणें. चित्र १, खुणा १--५.

आंतील कुडतेंः—कोठा उंची बंडीचे उंचीइतकी. बाही साधी.

जाकीटः—कोठा कमरेचा बारीक भाग. उंची चित्र २. खुणा टम. पाठ. खुणा यघ.

शॉर्ट कोट--चित्र २. कोठा--कमरेचा बारीक भाग. ढुंगणाचा उचलता

भाग, गळा. उंची मानेजवळील ३ हाडांपैकीं मधले मोठे हाडापासून कमरे-पर्यंत टम. त्या खालीं ज येथून पाहिजे असेल तितकी सुमारें घ पर्यंत.

बाही:—चित्र ३, खुणा १, २. पाठीची रुंदी, ३ पर्यंत कोपर, ४ पर्यंत मनगट.

पार्शी फॅ० कोट:---सर्व मापें सारखींच. गळ्याचें माप जरा खालीं उतरावें. उंची---हात खालीं सोडल्यानंतर करांगुली झांकेपर्यंत. चित्र २. खुणा टमजफ.

ओव्हरकोट---जितक्या कपड्यांवरून वापरणें असेल तितक्या कपड्यांवरून मापें घ्यावीत. उंची---पोटरी झांकेपर्यंत ह्मणजे चित्र २ ल पर्यंत.

पाटलोण---चित्र २. ढुंगण, कमर, यांचीं मापें एकेरी कपड्यांवरून घ्यावींत. बाहेरील उंची कमरेच्या वर दोन इंचापासून गुडघ्यापर्यंत. त्याखालीं टाचेपर्यंत. खुणा १-२. आंतील उंची जांघ्यापासून गुडघ्यापर्यंत. त्याखालीं टाचे-पर्यंत. खुणा ४-२. गुडघा---खुणा ८,९. मोहोळ ५,७.

जोधपुर पॅन्ट--गुडघ्याचें माप जास्त घ्यावें. पोटरीचें माप लश. मोहोळ.

नाइट कॅप---डोक्याचा घेर.

मुलांचे व स्त्रियांचे कपडे बेतण्याच्या पद्धति.

परकर---कमरेचा बारीक भाग. उंची कमरेपासून खालीं घोट्यापर्यंत.

कुंची---डोक्याचा घेर. उंची मानेपासून खालीं पायापर्यंत.

अंगी---कोठा. उंची गळ्यापासून गुडघ्यापर्यंत. बाही गळ्यापासून कोंपरापर्यंत. गळ्याचा घेर.

कानटोपी व गलुतें---डोक्याचा घेर व तोंडासभोंवतालचा घेर.

सरकफास--उंची व बाही–लांबी पाहिजे तेवढी.

मांडचोळणा---कमरेचा बारीक भाग. ढुंगणाचा मोठा भाग. मांडीचा मोठा भाग. उंची कमरेपासून गुढघ्यापर्यंत. आंतील उंची जांघेपासून गुढघ्यापर्यंत. चित्र २ पहा.

झगा---कोठा. उंची पाठीकडून, मानेपासून कमरेपर्यंत. त्या खालीं परकर घोट्यापर्यंत. बाही कोपरापर्यंत अथवा मनगटापर्यंत. गळा.

फ्रॉक--कोठा. उंची गळ्यापासून स्तनभागापर्यंत व त्या खालीं परकर नेहमींप्रमाणें.

फॅन्सी टोपी---तोंडासभोंवतालचा माथ्यावरून घेर. कपाळाच्या वरील भागापासून डोक्यावरून मानेपर्यंत. चित्र ६ पहा.

पोल्का ज्याकीट चोळया } चित्र ४. कोठा. नाडीचे एक टोंक दोन्ही स्तनाच्या मध्यावर धरून काखेंतन पाठीचे खुब्यावरून दुसरे काखेंतून नाडीचें पहिलें टोंकापर्यंत. खुणा **अब**. उंचावट्यालाच लागून खालची कडा खुणा **कड**. कमरेचा बारीक भाग **यम**. ढुंगणाचा उचलता भाग **न य**. गळ्याचा घेर **ग घ**. चोळीकारितां पुढील उंची गळ्यापासून छातीवरून छातीच्या कडेपर्यंत. **अबड** चोळीकारितां पाठीची उंची. चित्र ५ खुणा **अब**. पोल्क्याची उंची मानेपासून कमरेपर्यंत, त्याखालीं ढुंगण उचलते होत जाणाऱ्या भागापर्यंत **गयज**. उंचवट्यावरील कमी भाग **भफ**. मुंब्यासभोंवतालचा घेर चित्र ५. बाही लांबी गळ्यापासून आंब्यावरून कोपरापर्यंत **झकड**. चोळीकारितां किंवा अर्धी बाही व त्या पुढें सबंध बाही मनगटापर्यंत इ. को. फॅ. बाही--पाठीचे मध्यापासून बाही लागते तेथपर्यंत पाठीचें माप खुणा १-२. पुढें अर्धी बाही कोंपरापर्यंत ३. त्या पुढें मनगटापर्यंत ४. एकंदर उंची खुणा ५, ६, ७, ८, ९.

सूचना.

मापाची लांबी, रुंदी व कापडाचे पन्हे यांची साम्यता सहजरीत्या जमत नाहीं, म्हणून ओढाताणीनें एखादे वेळेस किंवा मुद्दाम कमी जास्त कापडाचे अवयव कापून घेणें भाग पडतें. कायम बाही म्हणजे काय---एकंदर बाहीकरितां माप, वजा कोट्याचा $\frac{1}{6}$ ओढें. देशी कपड्याकरितां व इंग्रजी कपड्याकरितां अर्धी पाठ चित्र ३. खुणा १-२. बाकी राहील ती कायम बाही पुढें दिली आहे. प्रत्येक कापड धुवून घेतण्याचा परिपाठ ठेवावा.

ज्यांना कपड्यास कापड किती लागतें हें मुळींच समजत नाहीं व प्रत्येक वेळीं ज्यांना शिंप्याकडे विचारावयास जावें लागतें त्यांच्याकरितां मुद्दाम प्रत्येक ठिकाणीं विवरण करून त्याखालीं कोष्टक दिलेलें आहे. वर दिलेल्या तऱ्हेनें मापें घेतलीं असतां पुढें दिलेल्या कोष्टकांतील प्रमाणाप्रमाणें अदमासें मापें येतील व कापड लागेल. डबल पन्हा असल्यास पुढें दिलेल्या प्रमाणांच्या निम्में कापड लागेल. कांहीं वेळां ह्यांतही फरक पडतो. हें थोडें बहुत ज्ञान प्राप्त करून घेतल्याशिवाय समजणार नाहीं.

आस्तरासंबंधीं नेहमीं सिंगल पन्हा व डबल पन्हा असा घोटाळा पडतो. परंतु एवढेंच ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, खिशाकरितां वगैरे थोडें जास्त कापड घ्यावें लागतें.

जागोजागीं खुणा व माहिती दिलीच आहे.

कोष्टकांत आडवे दिलेले आंकडे हे कापडाचे पन्हे होत व त्या खालीं दिलेल्या मापाप्रमाणें येणारे वार व इंच हें लागणारें कापड होय.

बारावंदी दुहेरी गुं० बंडी, व अंडर व्हेस्ट (आंतील कुडतें).

कोठयाचें माप, अधिक कोठ्याचा एक तृतीयांश रुंद व घेतलेल्या उंचीपेक्षां २ इंच जास्त लांब कापड आगापिछास घ्यावें; आणखी बाहीकरितां कोठयाइतकें रुंद व लांबीपेक्षां ५।६ इंच लांब इतकें घ्यावें. जसें--

इंच.			२७	३०	३६	४५	४८
कोठा.	उंची.	बाही कायम.	वार व इंच.				
२०-२४	१४	१२-१४	१—०	०-३१॥	०—२७	× ०--२२॥	× २२॥
३०-३२	२३	२३	२-४॥	२ ०	१—१८	× १--९	१-४॥
३४-३६	२४-२५	२४	२-९	२-४॥	× १--२७	१-१८	× १--९
३८-४०	२५-२६	२५	× २-१८	२-१३॥	× २--०	१--२२॥	१-१८

× एका बंडीहून जास्त करणें असल्यास इतकें कापड प्रत्येक बंडीस पुरतें. दुहेरी गुंड्यांचे बंडीकरितां असेंच कापड घेणें. अस्तर असल्यास ते असेंच घेणें.

आंगरखा.

कोठ्याचे मापाइतकें रुंद कापड घेऊन उंचीचे तिप्पट लांब, इतकें कापड घ्यावें.

इंच.			वार व इंच.					
कोठा.	उंची.	बाही कायम.	३२	३४	३६	३८	४५	४८
३२–३३	३२–३४	२२–२३	३–०	३–८	२–२७	२–२७	२–१८	२–१८
३४–३६	३६–३८	२३–२४	३–२७	३–१८	३–९	३–०	२–२७	२–२७
३८–४०	३८–३९	२५	४–०	३–२७	३–१८	३–९	३––०	२–३९॥

सद्रा--अखंड सद्रे इ०

साधारण प्रमाण कोठ्याच्या घेराची रुंदी व लांबीपेक्षां एकदोन इंच जास्त धरून दुप्पट करावी. अधिक कोठ्याचे घेराची रुंदी व बाहीची लांबी इतकें कापड पुरें होतें. एवढ्यावरून कमी जास्त कापडाचे पन्हे असल्यास तसतसे अवयव बसवावे. किंवा कोठ्याचे पाऊणपट रुंद व उंचीपेक्षां एकदोन इंच जास्त धरून दुप्पट करावी. अधिक बाहीचे लांबीची दुप्पट असें कापड घ्यावें. (थोरलें पुस्तक पहा.)

शर्ट असल्यास लांबी जास्त धरावी लागते, त्याप्रमाणें कापड जास्त लागतें. सद्यापेक्षां पाव वार, अर्धा वार जास्त लागेल (पन्ह्याप्रमाणें).

इंच.			२४	२७	३०	३२	३४	३६	४५
कोठा.	उंची.	बाही कायम. कफ	वार व इंच.						
३०–३२	२५–२६	२०	२–२७	२–१८	२–९	२ ४॥	२–०	× ३–१८	१––१८
३२–३४	२६–२७	२०	२–२७	× ५––०	२–१८	२–९	२–९	× ४–०	१–२२॥
३४–३६	२७–२८	२१	३–०	२–३१॥	२–१८	२–१८	२–९	× ४–९	१–२७
३६–३८	२८–२९	२१	३–०	३–०	२–२७	२–२२॥	२–१८	२–१३॥	१–२७
३८–४०	२९–३०	२२	३–९	३–४॥	३–०	२–२७	२–२२॥	२–१८	१–३१॥

× एका सद्याहून जास्त सद्रे असले तर प्रत्येकीं इतकें कापड लागेल.

शॉर्ट कोट.

कोठ्याचे मापाच्या पाऊणपट रुंद कापडाचा पन्हा ही रुंदी व उंचीमध्यें सुमारें ४ इंच मिळवून त्याची चौपट करावी इतकें कापड घ्यावें. याहून रुंद पन्हे असल्यास हिशेबानें जाकिटाचे पुढले भाग बसवावेत.

इंच.			२४	२७	३०	३४	३६	४५
कोठा.	उंची.	बाही कायम.	वार व इंच,					
२४—२६	१९—२०	१६—१७	× २—२७	२—९	× १--३१॥	१—२७	× १—९	१—०॥
३०—३२	२६	२२	३—०	३—०	३—९	२—९	२—१८	१—२७
३४—३६	२७—२८	२२—२३	३—२७	३—१८	३--१८	× २—२७	२—१८	२—९
३८—४०	२९—३०	२४—२५	४--९	३—२७	३—१८	३—१८	३—०	२—०

× जाकिटाचें फ्रंट्स बसवावे.

हंटिंगकोट व डबल ब्रेस्टेडकोट—वर सांगितलेल्या कोष्टकापेक्षां अर्धा वारपासून पाऊण वारपर्यंत ह्यास जास्त कापड लागतें.

अस्तर अशाच पन्ह्याप्रमाणें इतकेंच व आणखी सुमारें पाव वार जास्त घ्यावें.

डबल पन्ह्याचे कापडास कापड बेतानुसार कमी पुरतें.

पारशी कोट.

कोठ्याचें माप अधिक कोठ्याचा एक द्वितियांश यांचा अर्धा हिस्सा कापडाचा पन्हा रुंद व उंचीचें चौपट इतकें कापड घ्यावें. रुंद पन्ह्याचें कापड असल्यास त्या हिशेबानें कापड घ्यावें किंवा जाकिटाचे फ्रंट्स बसवावे.

इंच			२४	२७	३०	३४	३६	४५
कोटा.	उंची.	बाही कायम.	वार व इंच.					
२८—३०	२९—३०	२१—१२	३—९	३–१८	३—०	× २–२७	× २–१८	× १—२२॥
३०—३२	२९—३१	२२—२३	३–१८	४—९	× ३—२७॥	× २—३१॥	× २–२७	× २—१८
३३—३५	३१—३३	२२—२३	× ४–१८	× ३–२८	× ४—०	३—०	२–२७	× २—२७
३६—३८	३३—३४	२३—२४	४–१८	४—०	४—०	× ३—१८	३—०	२—३१॥

* जाकिटाचे फ्रंट्स बसवावे.

जाकीट.

कोठ्याचे मापापेक्षां १०-१२ इंच जास्त धरून त्याचा अर्धा हिस्सा रुंद व उंचीपेक्षां ५।६ इंच लांब याची दुप्पट ओपनफेस जाकिटाचे आगापिछास कापड पुरतें.

कालरचें असल्यास कालरकरितां आणखी सुमारें १२ इंच लांब कापड घ्यावें. निरनिराळे आगा व पिछा घेणें असल्यास लांबीची दुप्पट करूं नये. पुष्कळ वेळां पिछा निराळ्या कापडाचा करितात त्यावेळीं पिछास दुहेरी अस्तर व आग्यास एकेरी अस्तर वर सांगितल्याप्रमाणें घ्यावें व त्यामध्यें खिशांकरितां अस्तराचें कापड जास्त घ्यावें.

ओपनफेस फ्रंटस फक्त. +

इंच.		२४	२७	३०	३६
कोठा.	उंची कमरे पर्यंत.	वार व इंच.			
३०--३२	१५	०--२७	०--२२॥	× १--०	× ०--२२॥
३२--३६	१६	०--३१॥	०--२७	× १--०	× ०--२७
३६--३८	१७	१--०	०--२७	०--२७	× ०--३१॥

+ दोन फ्रंटस निघूं शकतील. कॉलरकरितां निराळें कापड घेणें. डबल ब्रेस्टेड जाकिटाकरितां रुंदींत आणखी दोन इंच जास्त कापड असावें. स्त्रियांचें जाकीट, कबजा यांविषयीं निराळें सांगणें नको.

बंदाची पेटी.

कोव्याचे माप आणखी तीन इंच रुंद व घेतलेल्या उंची पेक्षां दोन इंच लांब, अस्तर असल्यास इतकेंच कापड घ्यावें.

इंच.		१८	२२	२४	२७	३०
कोठा.	उंची.	वार व इंच.				
२०	१४	०--२४	०--२०	०--१६	०--१६	०--१४
२४	१५	०--२७	०--२२॥	०--१६	०--१६	०--१६
२८	२०	१--९	०--३१॥	०--३०	०--२७	०--२२
३२	२२	१--१३	१--१३	१--९	१--०	०--२७
३६	२४	१--१८	१--१८	१--१८	१	१

ओव्हरकोट.

हे कोट घेतलेल्या लांबी-रुंदीपेक्षां मोठे ठेवण्याचे असतात.

इंच.			सिंगल पन्हा. १८--२८	डबल पन्हा. २४	डबल पन्हा. २७	डबल पन्हा. ३०
कोठा.	उंची.	बाही कायम.	वार व इंच.			
३८—४	५५--५८	१५	८	३—१३॥	३—१३॥ ×	३— ०
३६—३८	५४--५५	२४	७--१८	३-- ४॥ ×	३— ४॥ ×	२—२७ ×
३४--३६	५२—५४	२४	७--१८	३-- ४॥ ×	३— ४॥	२—२७ ×
३२--३४	५०--५२	२३	७-- ०	३-- ० ×	२—२७	२—२२॥ ×
३०--३२	४८—५०	२२	६--१८	२--२७	२—१८ ×	२—१८ ×
२६--२८	३८--४०	२०	४—२७	२-- ९ ×	२— ९ ×	२—३१॥
२२--२४	३५	१८	३--१८	१--२० ×	१—२०	......
२२	३०	१५	२--२७	१--३३॥	१— ०	......

* डबल ब्रेस्टेड (दु० गुं० कोट) होऊं शकेल.

अस्तर त्या त्या पन्ह्याप्रमाणें पुरेल इतकें व खिसे वगैरेकरितां जास्त घ्यावें.

पाटलोण.

इंच.		२४	२६	२८-३०
ढुंगण.	उंची.	वार व इंच.		
२०—२४	२४	१—१८	१-१८	
...	२८	१--२७	१-२७	१-२७
२४—२६	३०—३२	२-०	२-०	२-०
२६—२८	३२—३४	२-४॥	२-४॥	२-४॥
२८—३०	३६--३८		२-१३॥	२-९
३०—३२	३८--४०		२-१३॥	२-१३॥
३२—३४	४०—४२		२-१८	२—१८
३४—३८	४२—४५		२-२७	२--२७
३६--४०	४५--४८		३-०	३—०

विजार.

इंच.		२४	२७	३०—३२	३३—३६
ढुंगण.	उंची.	वार व इंच.			
२०-२४	२६-२८	× १—९	× १—४॥	× १--०	× ०—३२
२४-२६	३०-३२	१-३१॥	× १—१८	१-१३॥	× १—४॥
२६-२८	३२-३४	२—०	× १—१८	× १-१४	१--९
२८-३०	३६-३८	२—९	× २-४॥	× १-२७	× १-१८

× एकाहून जास्त विजारी करणें असल्यास प्रत्येकी इतकें कापड लागेल.

वर दिलेल्या मापांपेक्षां मोठीं मापें असल्यास थोरलें पुस्तक पहावें किंवा पाटलोणी करणें चांगलें.

इराप विजारीस कापड त्या त्या लांबीच्या मानानें आणखी जास्त लागेल.

पोल्का.

खालीं दिलेल्या मापापेक्षां जास्त पन्हे असल्यास साधारण प्रमाण---कोठ्याचे मापाचे पाऊणपट रुंद व उंचीपेक्षां २ इंच जास्त धरून दुप्पट करावी व आणखी कोठ्याचे मापाइतकें रुंद व बाहीचे लांबीपेक्षां दोन इंच लांब असें कापड घ्यावें.

इंच.				वार व इं.		
कोठा.	उंची.	बाही कायम.	अर्धी बाही.	१८	२२	२४
१६–२०	१२–१३	१०		१–२७	१–३	१—९
,,	,,		५	१–१८	१–४॥	१—०
२०–२४	१३–१५	१३–१५		२–४॥	१–१८	१–१८
,,	,,		७–८	१–२७	१—९	१—९
२४–२६	१४–१५	१६–१८		२—९	२०	१–२२॥
,,	,,		९	१–२७	१–२२॥	१–१३॥
२६–२८	१५–१६	१८–१९		२–२७	२–४॥	२—४॥
,,	,,		१०	२—९	१–२७	१—१८
२८–३०	१६–१८	२०		२–२७	२–१८	२–९
,,	,,		११	२–१८	२—९	२—०
३०–३२	१८–१९	२२		३–४॥	२–१८	२—१८
,,	,,		१२	२–१८	२—०	२—०
३२–३४	१९–२०	२२		३—९	२–२७	२—१८
,,	,,		१२	२–२७	२—९	२—०
३४–३६	२०–२१	२३		३–१८	२–२७	२—१८
,,	,,		१२	३—०	२—९	२–०
३६–३८	२१	२३	१३ {	३–१८	३–१८	२—२७
३८–४०	२२	२४	१३ {	३—०	३—०	

बहुतेक कोठ्यांना वर दिलेल्या कापडांत झालर्स निघतील. अस्तर त्या त्या मापाप्रमाणें व पन्ह्याप्रमाणें घ्यावें.

फ्लॅनेल्स (अटणारीं कापडें) कांहीं जास्त घेऊन बेतावें.

झगे.

इंच.			२४	२८	३०	३३–३६
कोठा.	उंची.	बाही कायम.	वार व इंच.			
१६––१८	१८	१०	१–१८	१–९	१–४॥	२–०
१८––२०	२२	१२	१–२७	१–१८	१—९	१–४
२०—२२	२६	१४	२–४॥	२–०	१–२७	१–१८
२२––२४	३०	१६	२–१८	२–१८	२––४	२—०
२४––२६	३६	१८	३––०	३–०	२–२७	२–१८

वरील कापडांत फ्रिल्स वगैरे चांगले तऱ्हेनें काढितां येतील. जितकें जास्त कापड जिरवावें तितकी शोभा अधिक आहे. अस्तर घालणें असल्यास वरील भागापुरतेंच घ्यावें.

परकर.

जसें कापड जिरवावें तसा घेर मोठा दिसेल.


		उंची	कमर	वार
साधारण प्रमाणः---४ वर्षांपासून ६ वर्षांपर्यंत		२०	१८	१॥
६ ,, ८ ,,	,,	२४	२०	२
८ ,, १० ,,	,,	३०	२२	२॥

कुंची, आंगी, चोळ्या, मांडचोळणा, सरकफास, फॅन्सीटोपी, कानटोपी, नाईटकॅप, बनातीची टोपी, चड्डी इ० इ० ह्यांविषयीं येथें देण्यासारखें विशेष नाहीं. परंतु चोळ्यांची--फॅन्सी टोपीची चांगली माहिती थोरले पुस्तकांत दिली आहे ती पहावी.


विशेष गोष्टी.

ज्यांचीं मापें प्रमाणबद्ध येत नाहींत ह्मणजे लांबी जास्त तर रुंदी कमी, रुंदी जास्त तर लांबी कमी, त्यांना जास्त कापड लागतें असें नाहीं, परंतु हें ठरविणें कोष्टकावरून व स्वतःच्या हुषारीवरून आहे. लांबी रुंदी जास्त असल्यास एक उंचीचा पन्हा जास्त घ्यावा लागतो. मुलांच्या कपड्यांत एक पन्हा कमी घ्यावा लागेल हें अनुभवावांचून कळणार नाहीं. स्त्रियांच्या कपड्यांत अगदीं पृथक् पृथक् भाग कांपावयाचे असतात व बहुतकरून त्यांचे कपडे लहान पन्ह्यांत केले जातात तेव्हां उंचीचा एक एक पन्हा हिशेबाबाहेर आल्यास जास्त घ्यावा. कांहीं ठिकाणीं एकाहून जास्त कपडे करावे लागतात ह्मणजे कापड वाया जात नाहीं, वगैरे गोष्टी वेळोवेळीं सांगितल्याच आहेत. याहून जास्त माहिती थोरलें पुस्तक पहा किंवा प्रत्यक्ष.


मापे कशीं घ्यावी. चित्र १ ले



चित्र २ रे




चित्र ३ रे




M. C. PRESS POONA.

चित्र ४



चित्र ५



चित्र ६ वे.

फॅन्सी टोपी फ्रॉक



M.C. PRESS POONA.

शिक्षणकामाचा वर्ग.

हा ता० १५।१।०७ पासून सुरू झाला. दरमहा फी रु. २, वेळ ७॥ ते ८॥ रात्रौ. एक वर्ष लागतें. बाहेरगांवचे लोकांकरितां लौकर तयार होण्यास निराळे दर आहेत. त्याचा खुलासा--

३	महिन्यांत तयार होऊं इच्छिणारांस	रुपये	१००	पडतील.
४	,,	,,	७५	,,
६	,,	,,	५०	,,

गरीब विद्यार्थ्यांस फुकट शिक्षण दिलें जाईल. मात्र त्यानें तयार झाल्यावर आमचेकडे ३ वर्षेपर्यंत नोकरी केली पाहिजे. बॉन्ड लिहून द्यावा लागेल. काम पाहून पगार देऊं.

जेवणाखाण्याचा खर्च सर्व बाबतींत ज्याचा त्यानें केला पाहिजे. फी अगाऊ घेतली जाईल.